# 3 मार्च

**आजचा सुविचार :**

“आज आराम करून आयुष्यभर कष्ट करण्यापेक्षा शैक्षणिक जीवनात कष्ट करून आयुष्यभर आरामात जगणं कधीही चांगलं,”

**आजचे पंचांग :**

वार – गुरुवार

दिनांक : 3 मार्च 2022

मास – फाल्गुन

नक्षत्र – पू. भाद्रपदा

सुर्योदय – सकाळी 6. 50 वाजता

सूर्यास्त – सायंकाळी 6. 40 वाजता

**आजचे दिनविशेष :**

जागतिक वन्यजीव दिवस.

1847 ला टेलिफोन चा आविष्कार करणारे ग्राहम बेल यांचा जन्म.

1839 ला प्रसिद्ध भारतीय उद्योजक जमशेदजी टाटा यांचा जन्म.

1938 - सौदी अरेबियात खनिज तेल सापडले.

**आजचे इंग्लिश शब्द :**

1) honey – मध 2) hungry – भुकेला

3) husband – नवरा 4) idea – कल्पना

**आजची प्रश्नमंजुषा :**

1) जमिनीवरून वाहतूक करणाऱ्या कोणत्याही 4 वाहनांची नावे सांगा.

2) चार बहुवर्षीय वनस्पतींची नावे सांगा.

3) 2,435 या संख्येमध्ये 4 चे स्थानमूल्य ओळखा.

4) आपल्या शरीराचे तापमान साधारणत:किती डिग्री सेल्सिअस असते?

बोधकथा :

## एका पेन्सिलीची गोष्ट

राजा अस्वस्थ होता कारण त्याने इंग्रजीच्या परीक्षेत खराब कामगिरी केली होती. त्याची आजी त्याच्याजवळ आली आणि तिने त्याला एक पेन्सिल दिली.

विचारात पडलेल्या राजाने आजीकडे पहिले आणि म्हणाला, " माझ्या परीक्षेतील खराब कामगिरीनंतर मी ही पेन्सिल घेण्यास पात्र नाही."

आजीने समजावले, " तू या पेन्सिल कडून खूप चांगल्या गोष्टी शिकू शकतोस, कारण ती तुझ्यासारखीच आहे, ती पण धार लावून घेण्याचा वेदानादायी अनुभव घेते, अगदी तसाच जसा तू तुझ्या परीक्षेतील खराब कारागीरी केल्याचा घेतला आहेस! तरीही ती तुला एक चांगला विद्यार्थी घडवण्यास मदत करणार आहे. ज्याप्रमाणे हे पेन्सिलच्या आतून येते त्याप्रमाणे तुलाही अडथळ्यांना पार करण्याचे बळ तुझ्यातच सापडेल. आणि ज्याप्रमाणे पेन्सिल कुठलीही पृष्ठभागावर आपला ठसा उमटवते त्याचप्रमाणे तू ही जे काही करायला घेशील त्यावर तुझा ठसा राहील."

राजाला लगेच बर वाटलं आणि त्याने स्वत:ला वचन दिले की इथून पुढे चांगली कामगिरी करेल.

तात्पर्य – आपल्या सगळ्यांमध्ये आपल्याला हवं ते बनण्याची क्षमता असते.